शुक्रवार, दि. २८ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ९५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# काळ्या बाजारातील तांदुळ वाहतूक आणि सदर बाजार पोलीसांवर वसुलीचा आरोप

## EC, BNS व PCA कायद्यांचा थेट भंग; वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे

**दीपक शेळके**

**जालना -** जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याची चर्चा, वादग्रस्त कारवायांमुळे पुन्हा धगधगत आहे. दिवाळीपूर्वीच्या पाकिट प्रकरणानंतर, आता सरकारी रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात जाण्यासाठी घेतली जाणारी पोलिसांकडून 'वसुली' हा गंभीर आरोप समोर आला आहे. स्थानिक सूत्रांचा दावा आहे की, रात्री व पहाटेच्या सुमारास राशनचा तांदूळ वाहून नेणाऱ्या गाड्या थांबवणे, कागदपत्रांची चौकशीच्या नावाखाली दडपशाही, आणि नंतर 'मासिक' किंवा 'प्रति गाडी' फंड घेणे हे व्यवहार खुलेआम सुरू आहेत. या प्रकारामुळे कायद्याचा कचरा कोण करतोय? असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

अत्यावश्यक वस्तू अधिनियम (EC) १९५५ नुसार सरकारी रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात विकणे/वाहतूक करणे हा १ ते ७ वर्षांच्या शिक्षेस पात्र गुन्हा आहे. नवीन भारतीय दंड संहिता (BNS) अंतर्गत हा आर्थिक गुन्हा व जनहितास बाधा म्हणून विशेष गंभीर मानला जातो.

यावर पोलिसांनी माल जप्त करणे, वाहन ताब्यात घेणे, चालक व व्यापाऱ्यांवर गुन्हा दाखल करणे ही कार्यवाही बंधनकारक आहे. मात्र उलटच, पोलिसांच्या संरक्षणाखालीच हे वाहन अवैधपणे मार्गक्रमण करतात, असा आरोप होत असल्याने हा प्रकार थेट भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (PCA) च्या चौकटीत येतो.

**ठाण्यातील 'ढेकून-डोम कावळे' गँग शहरात 'खास' प्रसिद्ध!**

सदर बाजार पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांची ढेकून-डोम कावळे टीम म्हणून ओळख निमर्ण झाली आहे. जुगार, हॉटेल, बार, अवैध दारू, सट्टेबाज, आणि आता काळ्या बाजारातील तांदूळ या सर्वांकडून ही टीम 'कलेक्शन' करत असल्याची चर्चा शहरभर पसरत आहे. EC + BNS + PCA या तिन्ही कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करावा, सदर बाजार ठाण्यातील कर्मचारी तातडीने बदली, LCB व ACB मार्फत स्वतंत्र चौकशी, गोदाम व पुरवठा विभागातील 'आतील सांठगाठ' चौकशी, रात्रीच्या पाळीतील सीसीटीव्ही फूटेज तपासणी करण्यात यावी.

**सार्वजनिक वितरण प्रणालीला फटका - गरीबांचा हक्क लुटला जातोय!**

सरकार गरीबांसाठी दरमहा लाखो रुपयांचा तांदूळ पुरवते. तोच तांदूळ काळ्या बाजारात अवैध दराने विकला जात असेल आणि त्यावर पोलीस वसुलीचा सुळसुळाट असेल, तर हानी थेट गरिबांच्या पोटावरची थाप ठरते.

सामाजिक संस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग यांच्याकडे औपचारिक तक्रार देण्याची तयारी केली आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणात मोठी कारवाई किंवा धक्कादायक बाबी उघड होण्याची दाट शक्यता आहे.

### सदर बाजार पोलीसांनाच पडला कायद्याचा विसर

पोलीस विभागाचे मुख्य कार्य म्हणजे कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांचे संरक्षण करणे. भारतीय संविधान, पोलीस कायदे आणि नवीन भारतीय न्याय संहिता नुसार पोलीसांची प्रमुख कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत: कायदा सुव्यवस्था राखणे, शहर/गावात शांतता राहील याची काळजी घेणे, दंगे, मारामाऱ्या, गर्दी नियंत्रण, सार्वजनिक कार्यक्रमात सुरक्षा, गुन्हे प्रतिबंधित करणे, संशयितांवर नजर ठेवणे, गस्त घालणे, अवैध धंदे (जुगार, दारू, सट्टा, चोरी) रोखणे, गुन्ह्यांची चौकशी करणे, एफ. आय.आर. नोंद करणे, तपास करणे, पुरावे गोळा करणे, जबाब नोंदवणे, आरोपीविरुद्ध कोर्टात चार्जशीट दाखल करणे, नागरिकांचे संरक्षण करणे, महिलांची, मुलांची, ज्येष्ठांची सुरक्षा, आपत्कालीन परिस्थितीत मदत (अपघात, आग, नैसर्गिक आपत्ती) करणे. ही पोलीसांची काही प्रमुख कर्तव्य आहेत. असे असतांना सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत वाढती गुन्हेगारी, अवैध धंद्यांचा सुळसुळाट, रात्री बेरात्री उशिरा सुरु असलेली विविध आस्थापने या परिस्थितीमुळे सदर बाजार पोलीसांना या सर्व गोष्टींचा विसर पडला की काय अशी परिस्थती निर्माण झाली आहे.

## परतूर स्टेशन बांधकामाची रेल्वे अधिकाऱ्यांनी केली पाहणी

# पब्लिक ब्रिजची मागणी



**परतूर । प्रतिनिधी -** दक्षिण-मध्य रेल्वेचे नांदेड डिव्हिजनचे डी.आर.एम. प्रदीप कांबळी यांनी नुकतीच परतूर रेल्वे स्टेशनवर सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्टेशनवरील चालू असलेल्या बांधकामासंदर्भात उपस्थित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान, सामाजिक कार्यकर्ते अशोक ठोके यांनी डी.आर.एम. कांबळी यांच्याशी अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली. पंचशील नगर येथून परतूर शहरांमध्ये येण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, ही समस्या लक्षात घेऊन त्यांनी तातडीने पब्लिक ब्रिज (सार्वजनिक पूल) बांधण्यात यावा, अशी जोरदार मागणी केली. पंचशील नगर येथील नागरिकांसाठी हा पूल जीवनावश्यक असल्याने त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी, अशी विनंती अशोक ठोके यांनी केली.

परतूर रेल्वे स्टेशनवर सुरू असलेल्या विकासकामांच्या प्रगतीवर डी.आर.एम. कांबळी यांनी लक्ष केंद्रित केले, तर दुसरीकडे सामाजिक कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या पुलाचा मुद्दा प्रभावीपणे मांडला. यामुळे परतूरच्या रेल्वे विकास आणि सार्वजनिक सुविधांच्या मागणीला अधिक बळ मिळाले आहे

युवा आदर्श

**क्रांतीसूर्य ...**

धन्य तुझ्या जन्मांने
काटगावचीती माती
क्रांती सूर्या महात्मा
तव गुणगाव करती
पत्नी क्रांती ज्योती
करी दोघे स्वप्न पूर्ती
सार्थ जोडी दोघांची
देई एक दुजास्फुर्ती
करे समाज उथ्थापन
जाणे शिक्षण महती
वातीस लावून वाती
उजळी ज्ञान ज्योती
अंधश्रध्दे काजळली
काळ्या कभिन्न राती
तव रूपात ज्ञानाचा
दिवा मिळाला हाती
आडवे कर्मठ लोक
बांधी भीषण भिंती
रुढीपरंपरा न् जाती
दावी अज्ञान भिती
विधवा परित्यक्तांना
कळे नव्यानी नाती
दीन दुबळ्यां जनांस
दिली अद्भुत शक्ती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**


## जिल्हाधिकाऱ्यांची भेट आता एका क्लिकवर

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून डिजीटल युगास प्रारंभ

## जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांसाठी तीन अभिनव माहिती तंत्रज्ञान उपक्रमाची सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि सक्षम तांत्रिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तीन महत्त्वपूर्ण माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांचा शुभारंभ केला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून मार्गदर्शनाखाली हे उपक्रम विकसित करण्यात आले असून जिल्ह्याच्या डिजिटल युग प्रारंभ परिवर्तनातील हा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. या उपक्रमांमुळे शासकीय कार्यालयातील कामे आता घरबसल्या तसेच अगदी कमी वेळात पूर्ण करता येतील. तरी नागरिकांनी या डिजिटल सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि प्रशासनाच्या या डिजीटल प्रवासात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मिट युवर कलेक्टर या वेब-आधारित ॲप्लिकेशनद्वारे नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी ऑनलाईन स्लॉट बुक करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे भेट प्रक्रियेचे पूर्वनियोजन, वेळेची स्पष्टता आणि तक्रार निवारणातील कार्यक्षमता वाढणार आहे. कृषी क्षेत्रासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सअप चॅटबोट ॲग्रीपथ (९१७२८१४०६६) च्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेत रस्ता अतिक्रमणमुक्ती, नवीन शेतरस्ता प्रस्तावासाठी अर्ज तयार करणे, सरकारी सेवांची माहिती मिळवणे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी त्वरित संपर्क साधणे अशा सुविधा उपलब्ध होणार आहेत. जालना मित्र या सेवा चॅटबोटद्वारे (७३८७९३८७७४) नागरिकांना महा ई-सेवा केंद्रांच्या घरपोच सेवांसाठी अपॉइंटमेंट घेता येणार आहे. शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत सुरू केलेल्या या सेवेने नागरिकांना कार्यालयीन फेऱ्या कमी होवून सेवा थेट घरपोच मिळण्यास मदत होणार आहे. या तीनही उपक्रमांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी उन्मेष सपकाळ आणि जिल्हा आयटी टीम यांच्या संयुक्त प्रयत्नांतून करण्यात आली आहे. हे तीन उपक्रम जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेत अधिकाधिक वृध्दी करतील आणि नागरिकांना संवाद साधणे अधिक सोपे होईल. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधा विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होईल आणि शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ पध्दतीने मिळण्यास मदत होईल.




# जिल्हा नियोजन अन् पालकमंत्री मुंडेना झटका

## वादग्रस्त पत्रांवर पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती; मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वाचा आदेश

**जालना । प्रतिनिधी -** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका (झखङ) क्र. ३९/२०२५ मध्ये दिलेला अंतरिम आदेश जालना जिल्ह्यातील प्रशासनिक कामकाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अनिरुद्ध मारुती शेळके विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणात २५ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत वादग्रस्त पत्रांवरील कोणतीही कारवाई थांबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा नियोजन मधील विविध विकास कामांना ब्रेक लागला जाणार आहे. जिल्हा नियोजन अन् पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासाठी हा मोठा झटका आहे.

जिल्हा नियोजनातील कामांबाबात अनिरुद्ध शेळके यांनी यापुर्वी जिल्हाधिकाऱ्यांसह ईतरांना निवेदन दिले होते. या निवेदनात त्यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी मंजुर केलेली कामे रद्द करुन नियमानुसार कामांमध्ये सुधारणा करण्याबाबत कळविले होते. मात्र, या पत्रांची दखल न घेतल्याने त्यांनी मा. न्यायालयाचा मार्ग अवलंबला. याचिकाकर्ता अनिरुद्ध मारुती शेळके यांनी १८ सप्टेंबर २०२५ रोजी निर्गमित दोन पत्रांना आव्हान देत ही पीआयएल दाखल केली.

त्यात प्रमुख आरोप पुढीलप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कार्य) अधिनियम, १९९८ तसेच संबंधित शासकीय ठरावांचे उल्लंघन., ई-निविदा प्रक्रिया टाळण्यासाठी जाणूनबुजून कामांचे अनावश्यक उप-विभाजन., जालना जिल्हाधिकाऱ्यांना (प्रतिवादी क्रमांक ४) १८.०९.२०२५ रोजी दिलेल्या पत्रांच्या आधारे हे व्यवहार केल्याचा आरोप. याचिकाकर्त्याने दाखविलेले मुख्य उदाहरण म्हणजे बठाण खुर्द (तालुका : जालना) दुधना नदीच्या उजव्या तीरावरील पूरप्रतिबंधक भिंतीचे बांधकाम., हे काम पाच छोट्या भागांत विभागले गेले असून, प्रत्येक भागासाठी दहा-दहा लाखांची तरतूद दाखविण्यात आली. परंतु संपूर्ण प्रकल्पाची किंमत सुमारे रु. ५० लाखांपर्यंत जाण्याची शक्यता असल्याचा दावा याचिकाकर्त्याने न्यायालयासमोर मांडला.

**न्यायालयीन प्रक्रिया आणि नोटीस**

या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती श्रीमती विभा कणकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन एस. वेणेगावकर यांच्या खंडपीठासमोर झाली. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ (राज्य सरकारचे अधिकारी/विभाग) यांच्यासाठी सरकारी वकील यांनी नोटीस स्वीकारली. प्रतिवादी क्रमांक ६ ते ९ यांना नोटीस १९ डिसेंबर २०२५ पर्यंत बजावण्याचे आदेश.

**महत्त्वाचा अंतरिम आदेश : कारवाईवर स्थगिती**

न्यायालयाने दिलेला सर्वात महत्त्वाचा निर्देश असा की, वादग्रस्त पत्रांच्या आधारे कोणतीही कारवाई पुढील आदेशापर्यंत करू नये. म्हणजेच, १८.०९.२०२५ रोजीच्या पत्रांच्या आधारे प्रशासनाने पुढे नेलेली कामे, मंजुरी प्रक्रिया किंवा निधी जारीकरण यावर तात्पुरती स्थगिती लागू झाली आहे.

या आदेशामुळे जालना जिल्ह्यातील काही प्रस्तावित विकासकामांवर तात्पुरता ब्रेक लागण्याची शक्यता आहे. न्यायालय पुढील सुनावणीत या पत्रांची कायदेशीरता, कामांचे उप-विभाजन आणि निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता यावर सविस्तर सुनावणी घेणार आहे. प्रतिवादींकडून १९ डिसेंबरपूर्वी प्रत्युत्तर सादर केले जाणार. पुढील सुनावणीत जिल्हा नियोजन समिती अधिनियम, शासन आदेश, निविदा प्रक्रिया आणि निधी विभाजन या मुद्द्यांवर न्यायालय निर्णायक सुनावणी करणार. तोपर्यंत सर्व संबंधित कामांवर 'स्टे' कायम राहील.

संपादकीय पान

## महात्मा...



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

**विद्येविना मती गेली ।**
**मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली ।**
**गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे.**

### इंडियन जर्नालिस्ट एसोसिएशन चे ८ वे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन रांची येथे संपन्न

# पूर्व केंद्रीय गृहमंत्री सुबोध कांत सहाय यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष आमेर खान यांना पत्रकार रत्न अवार्ड

**जालना । प्रतिनिधी -** देशभराच्या पत्रकारांसाठी न्याय हक्कासाठी झटणारी संघटन इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशन यांचे आठवे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन झारखंड रांची येथे पार पडले आहे, या संमेलनामध्ये जालना येथून पत्रकार बांधव झारखंड रांची येथे उपस्थित झाले होते यावेळी इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशनचे जालना जिल्हा अध्यक्ष आमेर खान, सुनील भारती, शेख मुजीबुद्दीन यांच्यासह इतर पत्रकार बांधव सुद्धा उपस्थित झाले होते यावेळी जालना जिल्ह्यातील व मराठवाड्यातील पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी एकनिष्ठ लढवय्या तरुण आमेर खान यांना या पत्रकार संमेलनामध्ये पूर्व केंद्रीय गृह मंत्री सुबोध कांत सहाय यांच्या हस्ते पत्रकार रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, कारण मराठवाड्यासह जालना जिल्ह्यातील पत्रकार बांधवांच्या अडीअडचणी सोडवणे त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणे बातमी ही नुसती बातमी नसून ती जबाबदारी आहे, याचे भान ठेवून पत्रकारिता करणारे युवा पत्रकार आमेर खान यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे याप्रसंगी इंडियन जर्नालिस्ट एसोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष यांच्यासह देशभरातील पत्रकार बांधव उपस्थित झाले होते.



# तत्वचिंतक व्यक्तिमत्वाचे धनी!


क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची इतर नावे महात्मा फुले, ज्योतिबा फुले, आबा, राष्ट्रपितामह, तात्यासाहेब, शिक्षणसम्राट आदी आहेत. ते मराठी लेखक, कवी, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी, कामगार, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची पेरणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर त्यांचे ऋणनिर्देश करणारा अलककार- श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे यांचा हा लेख

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे.

शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र- ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत-

विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना सेंद्रिय बुद्धिवंत असे संबोधले आहे. जोतिराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. पुढे महात्मा फुलेजींनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी तद्वतच अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केली. त्यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण- सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद



पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढली. तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी- क्रांतिज्योती सावित्रीमाईंवर सोपविली. त्यांच्या सोबतीला ज्ञानज्योती फातिमाबी शेख सावलीसारख्या होत्या. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.

त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतिबांकडून रोज संतश्रेष्ठ कबीरांचा बीजमती हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे त्यांच्या मनावर संत विचारांची शिकवण चांगलीच बिंबली. अनेक दोहे त्यांना पाठ झाले. त्यातील एक- नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध! तुम कैसे बम्मन, हम कैसे क्षूद!!

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे रोखठोकपणे बोलत. मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी गुप्तशक्ती आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे, हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी आदी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे-धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्यानें वर्तावें। ईशासाठीं।। सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों। मनुजा सांगतो। जोती म्हणें।। (महात्मा फुले समग्र वाङ्मयः सार्वजनिक सत्य धर्म पुस्तकः अखंड- पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या. छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून- देवाचे नियमां प्रमाण धरुनी, चालें तुझें कूळ गे।। सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे।। अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी।। प्रीतीनें वरितो तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी।। .... शुभमंगल सावधान।।१।। (महात्मा फुले समग्र वाङ्मयः सत्यशोधक समाजोक्त पूजा-विधीः मंगळाष्टक- वरः पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर- सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीरावजी फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच! पावन स्मृतिनिमित्त त्यांच्या चरणकमली या लेकरांचे कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

**श्रीकृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे, मु. पिसेवडधा, पो. देलनवाडी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली. फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

### ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल वखारी येथे स्वसंरक्षण जनजागृती शिबीर

# मुली व महिलांना दिले स्वसंरक्षणाचे धडे

### जिल्हा पोलिस प्रशासनाचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** पोलीस अधीक्षक जालना अजयकुमार बंसल व अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जालना तालुक्यातील वखारी येथील ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल येथे मुली व महिलांच्या सुरक्षा,स्व-सरंक्षण, बालसरंक्षण मूलभूत मार्गदर्शन,अमली व नशेचे पदार्थ याविषयी जनजागृती,झजउड्ज कायदा जनजागृती या करिता एक दिवसीय सेल्फ डिफेन्स कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उदघाटन प्रमुख पाहुणे सचिन इंगेवाड (झख) जालना, संस्थेचे अध्यक्ष भगवानराव खैरे,यासीन दस्तगीर (झड्ख ) जालना,अक्तर शेख (ड्ख), जालना, प्राचार्य अण्णाभाऊ भालमोडे,शिवारकर साहेब,कुरेवार साहेब,गौतम बोबडे,रामेश्वर देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.शिबीरा दरम्यान मुली व महिला यांना आपल्याकडील साहित्याचा वापर करुन स्वतःचा व इतरांचा बचाव किंवा संरक्षण कशाप्रकारे करायाचे व सायबर क्राईम बाबत माहिती देण्यात आली तसेच तात्काळ पोलीस सेवेचा वापर त्यामध्ये डायल ११२ व १९३० बाबत माहिती देण्यात आली व प्रात्याक्षिक (डेमो) स्क्रीन वॅन वर दाखविण्यात आले.कार्यक्रमामध्ये ४००ते ५०० मुलींनी सहभाग नोंदवीला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सचिन इंगेवाड (झख ) यांनी सांगितले की,सदर शिबिर खास मुली व महिलांसाठी तयार करण्यात आलेले आहे. मुली व महिलांनी आचानक आलेल्या संकटाला सामोरे जाताना टेक्नीकचा वापर करुन स्वतःचे रक्षण करायाचे आहे.दामिनी पथक व इमर्जन्सी सेवा तात्काळ तुमच्या मदतीला धावुन येतील,जिल्हयात कुठेही छेडछाड प्रकार किंवा अतिप्रसंगी घडु नये घडल्यास योग्य वेळी सेल्फ डिफेन्स चा वापर करावा.तसेच मुली व महिलांनी स्वतःची काळजी घ्यावी आम्ही नेहमीच तुमच्या संरक्षणासाठी तत्पर आहोत असे सांगुन मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण केला व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया करण्यासाठी दि.१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तरी महिलांना विविध अडचणींना सामोरे जावे लागल्याने ई-केवायसी करण्यास आता दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी पात्र लाभार्थी महिलांनी पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी वेळेत करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



# आरोग्यसेवेत 'शिवशाही'चे सुशासन अपेक्षित, जनतेच्या हितासाठी सरकारने केरळच्या धर्तीवर कायदा करावा - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** केरळ उच्च न्यायालयाने २६ नोव्हेंबर रोजी एका ऐतिहासिक निकालात 'केरळ क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट क्ट'च्या तरतुदींना आव्हान देणाऱ्या इंडियन मेडिकल असोसिएशन (खच) आणि केरळ प्रायव्हेट हॉस्पिटल्स असोसिएशनच्या याचिका फेटाळून लावल्या. न्यायमूर्ती सुश्रुत अरविंद धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती स्याम कुमार व्ही.एम. यांच्या खंडपीठाने रुग्णांच्या हक्कांना प्राधान्य देणारा हा कायदा वैध ठरवला. या निकालाचे स्वागत करताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी महाराष्ट्रातही अशाच प्रकारच्या कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली आहे. आरोग्यसेवा ही जनतेची मूलभूत गरज आहे, छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे रयतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले, त्याचप्रमाणे सध्याच्या शासनाने खासगी रुग्णालयांच्या नफेखोरीला चाप लावून जनतेला दिलासा द्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

केरळ उच्च न्यायालयाच्या निकालातील महत्त्वाचे मुद्दे केरळ उच्च न्यायालयाने आपल्या निकालात अनेक महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत, जे रुग्ण हक्कांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत: सेवा आणि दरांची माहिती बंधनकारक: प्रत्येक रुग्णालयाला आपल्या दर्शनी भागात आणि वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या सेवांची यादी आणि प्रत्येक उपचारासाठी आकारले जाणारे शुल्क (पॅकेज रेट्ससह) इंग्रजी आणि मल्याळम भाषेत प्रदर्शित करणे बंधनकारक असेल.

आपत्कालीन परिस्थितीत उपचार नाकारता येणार नाहीत: कोणत्याही रुग्णालयाला केवळ पैशांअभावी किंवा कागदपत्रांच्या कमतरतेमुळे आपत्कालीन परिस्थितीत जीवनरक्षक उपचार नाकारता येणार नाहीत. रुग्णाला स्थिर करणे आणि आवश्यक असल्यास सुरक्षितपणे दुसऱ्या रुग्णालयात स्थलांतरित करणे ही रुग्णालयाची जबाबदारी असेल.

कर्मचाऱ्यांच्या माहितीची गोपनीयता: रुग्णालयांना आपल्या कर्मचाऱ्यांची माहिती नियामक प्राधिकरणाला द्यावी लागेल, परंतु ही माहिती सार्वजनिक केली जाणार नाही. गोपनीयतेच्या अधिकाराचा सन्मान केला जाईल. तक्रार निवारण यंत्रणा: प्रत्येक रुग्णालयात एक तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे आणि प्रत्येक तक्रारीची नोंद घेणे बंधनकारक असेल. ७ दिवसांच्या आत तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

रुग्णांचे हक्क आणि माहिती पुस्तिका: रुग्णालयात दाखल होताना प्रत्येक रुग्णाला त्याच्या हक्कांविषयी, उपचारांच्या खर्चाविषयी आणि तक्रार निवारण प्रक्रियेविषयी माहिती देणारी पुस्तिका देणे बंधनकारक आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, हा कायदा म्हणजे नवीन निर्बंध नसून, संविधानाने दिलेल्या आरोग्य हक्कांची अंमलबजावणी करणारी एक कार्यप्रणाली आहे.

महाराष्ट्राची स्थिती आणि कायद्याची गरज ॲड. धन्नावत यांनी निदर्शनास आणून दिले की, केंद्र सरकारने २०१० मध्ये 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट क्ट' लागू केला होता, ज्याच्या आधारावर अनेक राज्यांनी कायदे केले. केरळने २०१८ मध्ये हा कायदा लागू केला आणि आता उच्च न्यायालयानेही त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, महाराष्ट्रात २०१४ पासून हा कायदा केवळ चर्चेत आणि मसुद्याच्या पातळीवरच अडकून पडला आहे. वैद्यकीय संघटनांच्या दबावामुळे आणि सरकारच्या उदासीनतेमुळे राज्यातील सामान्य नागरिक आरोग्यसेवेतील पारदर्शकतेला आणि रुग्ण हक्कांच्या कायदेशीर संरक्षणाला मुकत आहेत.

**शिवछत्रपतींच्या प्रशासनाचा आदर्श**

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासनात रयतेच्या कल्याणाला नेहमीच अग्रक्रम दिला. त्यांनी कधीही मध्यस्थांना किंवा वतनदारांना सामान्य प्रजेचे शोषण करू दिले नाही. आज आरोग्यसेवेच्या क्षेत्रात खासगी रुग्णालयांकडून होणारी आर्थिक पिळवणूक ही एका प्रकारची आधुनिक सावकारीच आहे. महाराजांच्या राज्यात जसा जनतेचा विचार प्रथम होता, त्याचप्रमाणे लोकशाही सरकारकडूनही अपेक्षित आहे. केरळ सरकार आणि तेथील न्यायालयाने जो आदर्श घालून दिला आहे, त्याचे अनुकरण करून महाराष्ट्र सरकारने तातडीने 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट क्ट' लागू करावा. हा कायदा केवळ रुग्णालयांवर नियंत्रण ठेवणार नाही, तर रुग्णांना त्यांचे हक्क मिळवून देईल आणि संपूर्ण आरोग्य व्यवस्थेत एक सकारात्मक बदल घडवेल.

या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे रुग्णालयांना किमान मानके पाळणे, उपचारांचे दर प्रमाणित करणे आणि रुग्णांच्या तक्रारींसाठी एक प्रभावी यंत्रणा उभारणे बंधनकारक होईल, ज्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

## मुक्त विद्यापीठ कृषी शिक्षणक्रम पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरण्याची मुदत ०१ ते १५ डिसेंबर



**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कृषी शिक्षणक्रमाच्या प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमाच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा ही येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये तर अंतिम लेखी परीक्षा मे/जून २०२६ मध्ये होणार आहे. त्यासाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्याची मुदत येत्या सोमवार दिनांक ०१ ते १५ डिसेंबर २०२५ पर्यंत राहील. तसेच विलंब शुल्कासह दिनांक १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५ व विशेष विलंब शुल्कासह दिनांक २२ ते २६ डिसेंबर २०२५ पर्यंत हा अर्ज भरता येईल.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने यासंदर्भात सुचनापत्रक जारी केले आहे. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी संपलेला आहे, अशा कृषी प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमाच्या (कृषी पदवी वगळता) विद्यार्थ्यांनी प्रथम विहित पध्दतीने पुनर्नोंदणी करणे अनिवार्य आहे. पुनर्नोंदणीसाठी ०२५३ - २२३०१०६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावयाचा आहे. पुनर्नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच पुनर्परीक्षा अर्ज भरता येईल. विद्यार्थ्यांनी केवळ ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा अर्ज व शुल्क भरायचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन पद्धतीने न भरलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज भरण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला (http://ycmou.digitaluniversity.ac) भेट देऊन 'Online Exam Form Submission for Repeater Student' वर क्लिक करावे. त्यानंतर विद्यार्थ्याने आपला १६ अंकी नोंदणी क्रमांक (पीआरएन -PRN) नोंदवून अर्ज भरावा.

तसेच, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सर्व विद्यार्थ्यांना एबीसी आयडी (अॅकॅडमिक बँक ऑफ क्रेडीट) तयार करणे देखील अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांनी तो सादर केलेला नाही, त्यांचा अंतिम निकाल जाहीर केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांनी परीक्षेसंबंधी सर्व अद्ययावत माहिती व वेळापत्रकासाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ वेळोवेळी पहावे असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# मनपा सार्वत्रिक निवडणुक; प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीत अनियमितता दुरुस्त करा

### काँग्रेस कमिटीचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा हर्षवर्धन दादा सपकाळ साहेब व खासदार मा डॉ कल्याण काळे साहेब यांच्या सूचनेनुसार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकिसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार यादीतील मतदारांच्या चुकीच्या नोंदनी, मतदारांचे नाव एका प्रभागातुन दुसरया प्रभागात स्थलांतर करण्यात आले.

परप्रांतीय यांचे नाव मतदार यादित दिसुन आले, मतदराचे फोटो दोनदा, तीनदा तर कोठे दहा ठिकानी एक सारखे आढळले तसेच इतर अनियमितता प्रकरणी आज शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अतिक खान यांच्या नेतृत्वाखाली मा. ज़िल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. मा. ज़िल्हाधिकारी यांनी अक्षेप घेतलेल्या मतदार यादया लवकरच दुरुस्त करण्यात येतिल असे आश्वासन दिले..

यावेळी शकील शेख, चैतन्य जायभाये, इब्राहिम शेख, अड. दैने, वसीम शेख, करीम बिल्डर, सचिन जाधव, कलीम खान, अब्दुल रहीम तांबोली, रघुवीर गुडे, अड. सलमान, इमरान खान, फकीरा वाघ, नदीम भाई, संतोष पाटिल, मोहसिन खान, रोहित कसबे, शकील कुरैशी, जावेद शेख, नरेश रायपेल्ली , सय्यद कदीर व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# टेंभुर्णी कामगार सुरक्षा संच वाटपातील गैरव्यवहाराबाबत संताप

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** बांधकाम व इतर असंघटित कामगारांसाठी मुंबई येथील बांधकाम कामगार कल्याण मंडळामार्फत सुरक्षा संच (शी३८ ङ३) वाटप सुरू आहे. मात्र टेंभुर्णी येथील पात्र कामगारांना सुरक्षा किट मिळत नसल्याने आणि संबंधित कर्मचाऱ्यांकडून दमदाटी केली जात असल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या आठवडाभरापासून टेंभुर्णीतील अनेक कामगारांना सुरक्षा संच मिळावा म्हणून २० किमी अंतरावर असलेल्या राजूर केंद्रात वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. दिवसभर केंद्रावर बसूनही किट मिळत नाही, तर काही 'निवडक' कामगारांना मात्र गावातच किट देण्यात येत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. कामगारांनी सांगितले की वाटप केंद्रातील संबंधित कर्मचारी चौकशी केल्यावर उद्धट भाषेत उत्तर देत आहेत. तुम्हाला किट देत नाही, काय करायचं ते करा ! अशाप्रकारे दमदाटी आणि अपमानास्पद भाषा कर्मचाऱ्यांकडून वापरली जात

असल्याचे कामगारांच्या म्हणण्यानुसार स्पष्ट झाले. टेंभुर्णीतील मोठ्या संख्येने कामगार पात्र असतानाही त्यांना किट नाकारण्यात येत असल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत केंद्रात थांबूनही शेवटी रिकाम्या हाताने घरी परतावे लागते, यामुळे कामगारांच्या आर्थिक, मानसिक नुकसानीत भर पडत आहे.

या संपूर्ण गैरव्यवहाराचा निषेध करत संतप्त कामगारांनी शनिवारी राजूर पोलीस चौकीत निवेदन



देऊन योग्य चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे निवेदन देणाऱ्यांमध्ये शेख अर्शद, मुबारक पठाण, मंगेश बंगाळे, अयासखा पठाण, सांडू धनवई, दिनकर उखर्डे, शिवाजी देशमुख आदी कामगारांचा समावेश होता.

कामगारांनी पोलिस प्रशासनाला मागणी केली आहे की, किट वाटपातील भेदभावाची चौकशी करण्यात यावी. कामगारांशी केलेल्या उद्धट वर्तनाची नोंद घेऊन कारवाई करावी. टेंभुर्णीसाठी स्वतंत्र किट वितरण केंद्राची व्यवस्था करावी.

# मुणंबम जमीन वादः वक्फ कायद्याची प्रतिष्ठा पणाला, ६०० कुटुंबांचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयाच्या हाती

### ॲड. महेश धन्नावत यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -** केरळमधील मुणंबम येथील जमिनीच्या मालकी हक्काचा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. केरळ उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणारी याचिका केरळ वक्फ संरक्षण वेधीने दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर, आता सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे, असे मत ड. महेश धनावत यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालय वक्फ कायद्याला सर्वोच्च मानून कायद्याचे राज्य प्रस्थापित करणार की सुमारे ६०० कुटुंबांना न्याय देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. वक्फचा मूळ उद्देश हा लोककल्याण आहे आणि हे लक्षात घेता, या प्रकरणात एक प्रभावी तोडगा काढणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

केरळमधील मुणंबम येथील सुमारे १३५.११ एकर जमिनीवरून हा वाद सुरू आहे. ही जमीन १९५० मध्ये सिद्दीक सैत नावाच्या व्यक्तीने फारूक कॉलेजला दान केली होती. मात्र, त्या जमिनीवर अनेक वर्षांपासून सुमारे ६०० कुटुंबे वास्तव्य करत होती. कालांतराने, कॉलेजने या जमिनीचे काही भाग तेथील रहिवाशांना विकले, परंतु विक्री करारामध्ये ही मालमत्ता 'वक्फ' असल्याची नोंद केली नाही. २०१९ मध्ये, केरळ वक्फ बोर्डाने या जमिनीला अधिकृतपणे 'वक्फ मालमत्ता' म्हणून नोंदणीकृत केले. या




निर्णयामुळे जमिनीचे पूर्वीचे सर्व विक्री व्यवहार आपोआप रद्द ठरले आणि तेथे राहणाऱ्या कुटुंबांवर बेघर होण्याची टांगती तलवार आली.

**न्यायालयीन लढाई**

वक्फ बोर्डाच्या या निर्णयाला कोझिकोड येथील वक्फ न्यायाधिकरणात आव्हान देण्यात आले. दरम्यान, बाधित ६०० कुटुंबांच्या वाढत्या विरोधामुळे, केरळ सरकारने नोव्हेंबर २०२४ मध्ये निवृत्त न्यायमूर्ती सी. एन. रामचंद्रन नायर यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी आयोग नेमला.


या आयोगाच्या स्थापनेला केरळ वक्फ संरक्षण समितीने उच्च न्यायालयात आव्हान दिले. मार्च २०२५ मध्ये, एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा आयोग बेकायदेशीर ठरवत तो रद्द केला. मात्र, राज्य सरकारच्या अपिलावर सुनावणी करताना, ऑक्टोबर २०२५ मध्ये उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने एकल न्यायाधीशांचा निर्णय फिरवला आणि चौकशी आयोगाला कायदेशीर ठरवले. द्विसदस्यीय खंडपीठाने असेही निरीक्षण नोंदवले की, १९५० मधील करार हा 'दानपत्र' होता, 'वक्फनामा' नव्हे, आणि वक्फ बोर्डाचा हा निर्णय म्हणजे जमीन हडप करण्याचा प्रकार आहे.

**सर्वोच्च न्यायालयातील आव्हान**

आता केरळ वक्फ संरक्षण वेधीने उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांच्या याचिकेत म्हटले आहे की, हे प्रकरण वक्फ न्यायाधिकरणात प्रलंबित असताना राज्य सरकारने चौकशी आयोग नेमून आपल्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. तसेच, मालमत्तेचे स्वरूप ठरवण्याचा अधिकार नसतानाही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने त्यावर निरीक्षणे नोंदवली आहेत, जे अधिकारक्षेत्राचे उल्लंघन आहे.

ामुळे आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर या ६०० कुटुंबांचे भवितव्य अवलंबून आहे. न्यायालय वक्फ कायद्यातील तरतुदींना महत्त्व देणार की मानवी दृष्टिकोनातून या कुटुंबांना दिलासा देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याकरिता मंत्री शंभूराज देसाई यांना निवेदन



**मुंबई -** महाराष्ट्रातील कलाल-कलार समाजाच्या उन्नतीसाठी सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.याच अनुषंगाने दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ ला शिवसेना नेते आणि राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांना महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन निवेदन देण्यात आले.यावेळी निवेदनाच्या माध्यमातून त्यांना विनंती करण्यात आली की, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना गेल्या चार वर्षांपासून समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे या उद्देशाने प्रयत्नशील आहे.परंतु सरकारने कलाल- कलार समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत अजुनपर्यंत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.याकरीता संघटनेच्या माध्यमातून शिवसेना नेते आणि राज्याचे मंत्री श्री शंभूराज देसाई यांना विनंती करण्यात आली की, शिवसेनेच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या उद्देशाने आपण प्रयत्न करावे अशी विनंती निवेदनाच्या माध्यमातून शिवसेना नेते श्री शंभूराज देसाई यांना करण्यात आली. त्याचप्रमाणे समाजाला पारंपरिक मद्य व्यवसाय देण्यात यावा व लाडवाणी शाखेला कलाल २५४ मध्ये समाविष्ट करण्यात यावे इत्यादी विविध मागण्यांच्या संदर्भात निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने आपण सरकारच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून द्यावा अशीही समाजाच्या वतीने माननीय मंत्री महोदयांकडे मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार,राज्य प्रवक्ता रमेश लांजेवार, सरचिटणीस संतोष खंबलवार, कार्याध्यक्ष रविंद्र हटवार प्रामुख्याने उपस्थित होते.

# समाज कल्याण विभागाकडून संविधान दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान या कार्यक्रमांतर्गत बुधवार दि. २६ नोव्हेबर २०२५ रोजी संविधान दिन सहायक आयुक्त,समाजकल्याण जालना या कार्यालयात साजरा करण्यात आला आहे. मुख्य कार्यक्रमापुर्वी संविधान सन्मान रॅली व सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान जनजागृती रॅलीचा शुभारंभ जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंन्सल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. रॅलीचा प्रारंभ मंठा चौफुली येथून झाला आणि विद्यार्थ्यांनी संविधान मूल्यांच्या घोषणा देत मस्तगड येथे मार्गक्रमण केले. मस्तगड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील दुपारी १२.३० वाजता मुख्य कार्यक्रमास कार्यक्रमाच्या अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिमा मित्तल ,उदघाटक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे, सेवानिवृत्त उपप्राचार्य बी.वाय. कुलकर्णी, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री. राजकुमार म्हस्के , तसेच अविनाश बहिर आदि मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे यांनी केले . तद्नंतर संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संविधान उद्देशपत्रिकेतील समान संधी या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संविधानातील मूल्यांना दैनंदिन आयुष्यात जगण्याचे आवाहन केले . तसेच शासकीय वसतिगृह निरीक्षण समितीच्या अध्यक्ष या नात्याने वसतिगृह व शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सोयी- सुविधा देण्यासाठी व त्यांच्या अडचणी समजून त्यांचे निराकरण करण्यासाठी नेहमी तत्पर असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या उद्‌घाटक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना श्रीमती मिन्नू पी.एम यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन संविधानातील मुलभूत तत्वावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते से.नि उपप्राचार्य बी.वाय.कुलकर्णी यांनी संविधानातील मूलभूत मूल्यांवर प्रभावी विचार व्यक्त केले. तसेच डॉ. राजकुमार म्हस्के यांनी संविधानाबाबत आपले विचार व्यक्त केले. इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी अविनाश बहिर यांनी उपस्थितास मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये जिल्हाधिकारी जालना यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता पुरस्कार प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना धनादेश व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांच्या हस्ते शासकीय निवासी शाळा व वसतिगृहातील संविधान दिनानिमित्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना, सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच शासकीय निवासी शाळा बदनापूर येथील राज्यस्तर व विभागस्तर क्रिडा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सत्कार करण्यात आला. मुलींची शासकीय निवासी शाळा जालना येथील विद्यार्थीनी संविधानावर आधारित पथनाट्य कार्यक्रमात सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक डॉ. दिलीप गिरी यांनी केले. कार्यक्रमात सहायक आयुक्त,समाजकलयाण जालना कार्यालयातील व सर्व शासकीय वसतिगृह , शासकीय निवासी शाळा कार्यालयातील सर्व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. असे कळविले आहे.

# माहितीचा अधिकार कायदा २००५ विषयी मुक्त विद्यापीठात दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा



**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'माहितीचा अधिकार कायदा २००५' याविषयीची दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्र सभागृहात विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्धाटन करण्यात आले.


व्यासपीठावर यशदाचे सत्र संचालक तथा संशोधन अधिकारी श्री. दादू बुळे, यशदाच्या मुख्य प्रशिक्षक श्रीमती रेखा साळुंखे, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, विद्यापीठ ग्रामीण विकास आणि उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या उद्धाटनप्रसंगी बोलतांना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की पाक - बांगलादेश या आपल्या शेजारी राष्ट्रांसह जगातील बहुतेक देशांमध्ये अराजकता व अस्वस्थता आहे. त्यातुलनेत प्रगतीशील भारतात संविधानानुसार राज्यकारभार सुरु आहे. माहितीचा अधिकार कायदा - २००५ हा त्याचाच परिपाक आहे. असा हा माहितीचा अधिकार वापरतांना या कायद्याचे प्रयोजन, उद्देश, तर्क, परिणाम व फलनिष्पत्ती समजून घेतली पाहिजे. सकारात्मक दृष्टीकोनातून, चांगल्या कामासाठी त्याचा वापर करावा असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. यशदाचे सत्र संचालक तथा संशोधन अधिकारी श्री. दादू बुळे यांनी माहिती अधिकारातून आपल्याविरुद्ध कोणी अपिलात जाणार नाही एवढी कामकाजात पारदर्शकता ठेवावी असे आवाहन केले. यशदाच्या मुख्य प्रशिक्षक श्रीमती रेखा साळुंखे यांनी आपल्या मार्गदर्शनात आपण माहितीचे मालक नाही तर संरक्षक व जनतेचे सेवक आहोत अशी भावना मनात ठेवून काम करावे असे आवाहन केले.

या कार्यशाळेत माहितीचा अधिकार कायदा - २००५, त्यातील विविध कलमे, तरतुदी, वैशिष्ट्ये, अर्जाचे प्रकार व ते निकाली कसे काढावेत, परिपत्रके, मार्गदर्शक सूचना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी विद्यापीठातील विविध विद्याशाखा संचालक, कार्यरत जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी, प्राध्यापक, आणि इतर अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रास्ताविक विद्यापीठ ग्रामीण विकास आणि उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांनी तर सूत्रसंचालन श्री. किशोर शिंदे यांनी केले.

**मुंबई -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार आहे. याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे भवितव्य ठरणार आहे. राज्यात सध्या २४६ नगरपालिका,४२ नगरपंचायतींच्या निवडणुकींची रणधुमाळी सुरू आहे.

# उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांना निलंबित करा- भाऊसाहेब गोरे



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा -परतूर तालुक्यातील उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड हे नेहमीच वादग्रस्त विषयात कार्यरत असून वाळू माफियांना पण यांचे अभय आहे तसेच विविध महसुली प्रकरणातअनेक प्रकरणात पद्माकर गायकवाड हे चिरीमिरी घेतल्याशिवाय प्रकरणाचा निकाल देत नाहीत अशी चर्चा मंठा-परतूर तालुक्यात असून याप्रकरणी सामान्य नागरिकाची वारंवार पिळवणूक होत आहे. संदर्भीय विषयात माननीय जिल्हाधिकारी यांना सर्व पुरावे सादर करण्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाऊसाहेब गोरे यांनी दिले आहे. रेती माफियांना अभय देणे त्यांच्याकडून विविध प्रकारचे हप्ते घेणे हे नित्याचेच आहे. नुकतीच झाली पोलीस पाटील भरती पार्श्वभूमीवर एका पोलीस पाटील भरती प्रकरणी अल्पवयीन मुलाची नियुक्ती ही पाच लक्ष रुपये घेऊन केल्याचे नियुक्ती केल्याचे चर्चा नागरिकात असून या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते भाऊसाहेब काका गोरे यांनी या प्रकरणी चौकशीची मागणी केली आहे. सदरील प्रकरणी चेस्तरीय समिती नेमून गांभीर्याने चौकशी करण्यात यावी अशी मागणी देखील ते माननीयमुख्यमंत्र्यांकडे करणार आहेत. हा प्रकार खूप गांभीर्य असून माननीय जिल्हाधिकारी यांनी सुद्धा या प्रकरणी लक्ष घालावे अशी अपेक्षा भाऊसाहेब काका गोरे यांनी केली आहे

# संविधानाचा स्वीकार हा केवळ ग्रंथाचा स्वीकार नव्हे, तर नव्या युगाची पायाभरणी - ॲड. महेश धन्नावत



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधानाचा स्वीकार म्हणजे केवळ एका ग्रंथाचा स्वीकार नव्हता, तर तो एका सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्याच्या निर्मितीचा संकल्प होता, असे प्रतिपादन कायदेतज्ज्ञ ड. महेश सीतारामजी धन्नावत यांनी केले. संविधान दिनानिमित्त हनुमान घाट येथील समता बौद्ध विहारात आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

ॲड. धन्नावत यांनी आपल्या भाषणाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून केली. त्यांनी संविधानाच्या उद्देशिकेला 'लोकशाहीचा आत्मा' असे संबोधले. ते म्हणाले, 'आम्ही भारताचे लोक...' या शब्दांनी सुरू होणारी उद्देशिकाच या देशातील अंतिम सत्ता जनतेच्या हातात असल्याचे स्पष्ट करते. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३) या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक खटल्याचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, उद्देशिका हा संविधानाचा अविभाज्य आणि मूलभूत भाग असून, त्यात संसद बदल करू शकत नाही.

संविधानाने सर्वसामान्यांना, विशेषतः गरीब आणि सर्व जाती-धर्माच्या लोकांना दिलेल्या हक्कांचे महत्त्व विषद करताना ड. धन्नावत यांनी मूलभूत हक्कांना 'सुरक्षा कवच' म्हटले. त्यांनी कलम १४ (कायद्यापुढे समानता), कलम १७ (अस्पृश्यता निवारण) आणि कलम २१ (जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क) यावर विशेष भर दिला. मेनका गांधी विरुद्ध भारतीय संघ (१९७८) खटल्याचा दाखला देत ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ ची व्याप्ती वाढवून केवळ जगण्याचा हक्कच नव्हे, तर 'सन्मानाने जगण्याचा हक्क' हा मूलभूत हक्क असल्याचे स्पष्ट केले. यामुळे प्रत्येक नागरिकाला प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार मिळाला आहे. भारतीय न्यायपालिकेच्या भूमिकेचे कौतुक करताना त्यांनी संविधानाच्या संरक्षकाची भूमिका न्यायव्यवस्थेने नेहमीच चोख बजावली असल्याचे सांगितले. त्यांनी 'इंदिरा साहनी विरुद्ध भारतीय संघ' (आरक्षणातील क्रिमी लेयर), 'विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य' (कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता) आणि 'नालसा विरुद्ध भारतीय संघ' (तृतीयपंथीयांना कायदेशीर ओळख) यांसारख्या महत्त्वपूर्ण निवाड्यांचा उल्लेख केला, ज्यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक व्यापक झाली.

भाषणाच्या समारोपात ड. धन्नावत यांनी नागरिकांना आवाहन केले की, संविधान दिन केवळ उत्सव म्हणून साजरा करणे पुरेसे नाही, तर संविधानाने दिलेली न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे. जेव्हा या देशातील शेवटच्या माणसालाही त्याचे हक्क मिळतील आणि तो सन्मानाने जीवन जगेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने संविधान दिन साजरा होईल.

यावेळी लोकनेता गणेश राऊत, संजू भाऊ गायकवाड, संदीप नाईकवाडे, डॉ.अमित हजारे, भानुदास दोबाले, अब्दुल माझी, गेंदालाल झुंगे, विलास शेवाळे, विनोद जाधव, सौरभ इंगळे, अनिकेत खिल्लारे,धम्मपाल दाभाडे, आदित्य खरात, आदित्य साबळे, सूत्रसंचालन राजू वाघमारे तर उद्देशिकाचे वाचन श्याम सारस्वत यांनी केले.

# डॉ.संजीवनी तडेगांवकर यांना काव्ययोगिनी पुरस्कार घोषित



**जालना -** पुणे येथील साहित्य भगिनी मंडळ संस्थेच्या वतीने जेष्ठ दिवंगत कवयित्री योगिनी जोगळेकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी कवितेतील समग्र योगदानासाठी दिला जाणारा काव्ययोगिनी पुरस्कार यंदा जालना येथील भाव कवयित्री, मसाप केंद्रीय कार्यकारिणीच्या संचालिका डॉ.संजीवनी तडेगांवकर यांना घोषित झाला आहे.

रोख रक्कम ,सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून रविवारी (ता. ३०) पुणे येथे होणाऱ्या ४१व्या स्त्री लेखिका साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्षा हिंदी लेखिका डॉ. सविता सिंह यांच्या हस्ते तसेच अ. भा. साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा अरुणा ढेरे ,लक्ष्मीकांत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान केला जाणार असल्याचे संस्थेच्या अध्यक्षा अंजली कुलकर्णी ,विश्वस्त मंदा खांडगे यांनी कळवले. पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. संजीवनी तडेगावकर यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

दरम्यान डॉ.संजीवनी तडेगांवकर यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारांसह यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर,महाराष्ट्र कामगार परिषद पुणे, कोपरगाव, नांदेड, जिंतूर येथील नामांकित संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे.

## 'थायरॉईड' विरुद्ध विशेष अभियानांतर्गत आतापर्यंत ४ हजारपेक्षा अधिक चाचण्या

# निशुल्क शिबिर आयोजनासाठी इच्छुक सेवाभावी संस्थांनी आमच्याशी संपर्क साधावा - डॉ. सेठीया

**जालना । प्रतिनिधी -** सहसा लक्षात न येणारा आणि दुर्लक्षित मानला जाणारा परंतु, हळूहळू संपूर्ण शरीराची प्रणाली विस्कटवणारा थायरॉईड आजार आता चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. या सायलेंट किलरविरुद्ध जालना जिल्ह्यात सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आणि रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या सहकार्यातून प्रकल्प प्रमुख रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात निशुल्क १० हजार थायरॉईड चाचण्यांचे अभियान राबविण्यात येत असून, गेल्या पाच महिन्यात चार हजार पेक्षा अधिक चाचण्या मोफत करण्यात आल्या आहेत.

गत वर्षी अबकी बार एक लाख पार हे मोफत मधुमेह निदान चाचणीचे अभियान रोटरी प्रांतात राबविण्यात आले होते. त्यात दीड लाख चाचण्या निशुल्क करण्यात आल्या होत्या. यासाठीही सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे विशेष योगदान लाभले होते. यावर्षी ट्रस्टच्या माध्यमातून १ जुलैपासून दहा हजार थायरॉईड मोफत चाचण्यांचे हाती घेण्यात आलेले अभियान ३० जून २०२६ पर्यंत राबविले जाणार आहे. उपक्रमांतर्गत आतापर्यंत चार हजारांहून अधिक तपासण्या केल्या गेल्या असून, प्रत्येक शिबिरात दहा टक्के लोकांना थायरॉईड असल्याचे निदान झाले आहे. यासंदर्भात अधिक माहिती देताना डॉ. सेठीया म्हणाले की, या अभियानाची संकल्पना सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांची असून, आतापर्यंत विविध शाळा, महाविद्यालये, औद्योगिक कंपन्या, सामाजिक संस्था, धर्मस्थळे याठिकाणी ४१ निदान शिबिरे घेण्यात आली आहेत. दोन दिवसांपूर्वी गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील गुरुद्वारातही शिबिर घेण्यात आले. डॉ. राजेंद्र प्रसाद मार्गावरील रुबी हॉस्पिटलमध्ये यापूर्वी दोन शिबिरे घेण्यात आली असून, तिसरे शिबिर २९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.

भारतामध्ये थायरॉईडचे निदान झालेले रुग्ण ४ कोटी २० लाख आहेत, परंतु यापेक्षा जास्त म्हणजे १० ते १५ कोटी लोकांना थायरॉईड असूनही त्यांना त्याची कल्पनाही नाही. विशेषतः महिलांमध्ये या आजाराचे प्रमाण प्रचंड आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार महिलांमध्ये थायरॉईडचा दर ८९ टक्के तर पुरुषांमध्ये केवळ ११ टक्के आहे. हा आजार हळूहळू वाढतो आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यास वंध्यत्व, हृदयविकार, हाडांची कमजोरी, लठ्ठपणा, नैराश्य, मानसिक अस्थिरता अशा गंभीर समस्या निर्माण होतात. थायरॉईडचे निदान उशिरा होण्यामागचे एक कारण म्हणजे ही चाचणी सर्वसामान्यांसाठी खर्चिक असते. त्यामुळे अनेकजण तपासणी न करता या आजारासोबत जगत राहतात. हा विचार बदलण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येत आहे. विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, शैक्षणिक संस्था, औद्योगिक आस्थापनांनी या अभियानाच्या माध्यमातून आपल्या परिसरात शिबिर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

डॉ. सेठीया पुढे म्हणाले की, थायरॉईडची लक्षणे साधी आणि अनेकदा दुर्लक्षिली जातात; पण हीच लक्षणे पुढे गंभीर स्थिती घडवतात. वजन वाढणे किंवा अचानक घटणे, खूप जास्त थकवा, झोपेची गुणवत्ता बिघडणे, चिडचिड, केस गळणे, त्वचा खूप कोरडी होणे, मासिक पाळीतील अनियमितता, थंडी जास्त जाणवणे, बेचैनी, वाढलेली भूख आणि हृदयाचे वाढलेले ठोके ही थायरॉईडची प्रमुख चिन्हे आहेत. रोग लपवला, तर तो वाढतो; शोधला, तर थांबतो. वेळेत निदान आणि योग्य उपचार हेच या सायलेंट किलरवरचे सर्वात मोठे उत्तर आहे. मोफत शिबिरात तपासणी करून घ्या, जाणून घ्या आणि स्वतःला व आपल्या कुटुंबाला सुरक्षित ठेवा;कारण आरोग्यच खरी संपत्ती असल्याचे डॉ. सेठीया म्हणाले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.